# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः24.01.2026** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधान आज विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नव्याने नियुक्त झालेल्या 61 हजार जणांना नियुक्तीपत्रं वितरित करणार
2. कर्तव्यात कसूर आणि गैरवर्तन करणाऱ्या बूथ स्तरीय अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निवडणूक आयोगाचे सर्व राज्यांच्या मुख्य निवडणूक आधिकाऱ्यांना निर्देश
3. 77 व्या प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या संचलन सोहळ्याची दिल्लीत कर्तव्य पथावर जोरात तयारी सुरू, ऑपरेशन सिंदूरवर आधारित लष्कराचा चित्ररथ यंदाचं खास आकर्षण आणि
4. युक्रेन संघर्ष संपविण्यासंदर्भात रशिया, युक्रेन आणि अमेरिकेच्या प्रतिनिधींची अबुधाबीमध्ये चर्चा

**<u>रोजगारमेळा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज 18व्या रोजगार मेळ्यात विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नव्याने नियुक्त झालेल्या 61 हजार जणांना दूरस्थ पद्धतीनं नियुक्तीपत्रांचं वाटप करणार आहेत. या कार्यक्रमाला ते संबोधितही करतील. हा रोजगार मेळा देशभरात 45 ठिकाणी होणार आहे. पुण्यात तळेगाव इथं होणाऱ्या रोजगार मेळ्याला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, पंतप्रधानांनी काल केरळमध्ये तिरुवअनंतपुरम् इथं 'प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना' अर्थात पी एम स्वनिधी क्रेडिट कार्ड योजनेचा आरंभ केला.

**<u>व्हाईट गुडस</u>**

केंद्र सरकारनं मोठ्या आकारातील घरगुती विद्युत उपकरणांच्या अर्थात व्हाईट गुड्ससाठीच्या उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनेच्या चौथ्या फेरीत 863 कोटी रुपयांच्या निश्चित गुंतवणुकीसह पाच कंपन्यांची निवड केली आहे. या पाच कंपन्या एअर कंडिशनर घटकांच्या निर्मितीमध्ये गुंतलेल्या असून 2027-28 या आर्थिक वर्षापर्यंत 8 हजार 300 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचं उत्पादन करतील, तसंच 1 हजार 799 अतिरिक्त प्रत्यक्ष रोजगार निर्माण करतील, अशी अपेक्षा असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे. या व्हाईट गुड्ससाठीच्या पीएलआय योजनेअंतर्गत चौथ्या फेरीत प्राप्त झालेल्या 13 अर्जांचं मूल्यांकन केल्यानंतर या पाच कंपन्यांची तात्पुरती निवड करण्यात आली आहे. या नवीन फेरीसह आता व्हाईट गुड्ससाठीच्या पीएलआय योजनेअंतर्गत एकूण 85 कंपन्यांची निवड झाली आहे, त्यामध्ये एअर कंडिशनर आणि एलईडी लाइट्स उत्पादन करणाऱ्या कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्यांकडून 11 हजार 198 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची आणि योजनेच्या कालावधीत 1 लाख 90 हजार कोटी रुपयांचं एकत्रित उत्पादन करण्याची अपेक्षा आहे. या उपक्रमामुळे देशांतर्गत उत्पादन क्षमता लक्षणीयरीत्या भक्कम होण्याची आणि या क्षेत्रातील आर्थिक वाढीला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

**ऊर्जा सप्ताह**

चौथा भारत ऊर्जा सप्ताह 27 ते 30 जानेवारी या कालावधीत गोव्यात आयोजित केला जाणार आहे. भारत ऊर्जा सप्ताह -2026 ऊर्जा सुरक्षा, आर्थिक विकास आणि स्थिरतेप्रती देशाची वचनबद्धता दर्शवतो, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंह पुरी यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलताना सांगितलं. चार दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमामुळे प्रमुख जागतिक ऊर्जा केंद्र आणि जागतिक ऊर्जा संक्रमणातील विश्वासू भागीदार म्हणून भारताची प्रतिमा अधिक बळकट होईल असंही पुरी म्हणाले, गेल्या चार वर्षात जागतिक ऊर्जा कॅलेंडरमध्ये भारत ऊर्जा सप्ताहानं विशिष्ट स्थान मिळवल्याचंही त्यांनी सांगितलं.

**निवडणूक आयोग**

भारतीय निवडणूक आयोगानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना बूथ स्तरीय अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर आणि गैरवर्तन केल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. कर्तव्यात कसूर, हलगर्जीपणा, गैरवर्तन, आपल्या सूचनांचं जाणूनबुजून पालन न करणं किंवा लोकप्रतिनिधी कायदा आणि मतदार नोंदणी नियमांच्या तरतुदींचं उल्लंघन यासारख्या प्रकरणांमध्ये निलंबनासह कठोर कारवाई केली जाईल, असं आयोगानं मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. गुन्हेगारी स्वरुपाच्या गैरवर्तनाचे प्रकार आढळल्यास एफआयआरही नोंदवला जाऊ शकतो असंही आयोगानं म्हटलं आहे

**संचलन रंगीत तालीम**

राजधानी नवी दिल्लीत कर्तव्य पथावर सोमवारी होणाऱ्या 77 व्या प्रजासत्ताक दिन संचलन सोहळ्याची जोरात तयारी सुरू आहे. या संचलनाची रंगीत तालीम काल कर्तव्य पथावर पार पडली. भारताचा समृद्ध वारसा, लष्करी सामर्थ्य, सांस्कृतिक वैविध्य यांचं प्रतिबिंब या कार्यक्रमात प्रकर्षानं दिसून आलं. संरक्षण दलाच्या विविध कवायत तुकड्या तसंच राज्यं, केंद्रशासित प्रदेश, काही मंत्रालयं आणि विभाग यांच्या चित्ररथांनी प्रजासत्ताक दिनाची उत्सुकता वाढवली आहे. यंदाच्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात ऑपरेशन सिंदूरमध्ये देशानं मिळवलेला विजय आणि तीनही सैन्य दलांचा समन्वय यांचं दर्शन घडवणारा लष्कराचा चित्ररथ पाहायला मिळेल, असं दिल्ली उपविभागाचे चीफ ऑफ स्टाफ मेजर जनरल नवराज धिल्लों यांनी काल सांगितलं. रणगाडे, क्षेपणास्त्र प्रणाली, ड्रोन यांच्या सहाय्यानं प्रथमच युद्धभूमीवरील रचना सादर केली जाणार आहे. सुमारे 6 हजार 50 सैनिक यात सहभागी होणार असून लेफ्टनंट जनरल भवनीश कुमार चौथ्यांदा नेतृत्व करणार आहेत. पहिल्यांदाच भैरव बटालियन, शक्तिवान रेजिमेंट आणि लडाख स्काऊट संचलनात भाग घेणार आहेत. यंदा सैन्याचं प्राणी पथकही प्रथमच कर्तव्यपथावर संचलनात सहभागी होणार आहे.

**हिंद दि चद्दर**

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहीदी वर्षानिमित्त आज आणि उद्या महाराष्ट्रातील नांदेड इथल्या मोदी मैदानावर हौतात्म्य सत्संग सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह देशातल्या अनेक राज्यांचे मुख्यमंत्री तसंच अनेक मान्यवर या सोहळ्यासाठी नांदेड इथं येणार आहेत. या अनुषंगाने आज सकाळी तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा ते मोदी मैदान पर्यंत मिरवणूक काढण्यात येणार आहे. काल झालेल्या विशेष कीर्तन सोहळ्यात 350 शालेय विद्यार्थ्यांनी एका सुरात श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 'शब्द गुरबानी'चे गायन करून अनोखी स्वरांजली अर्पण केली.

**रशिया-युक्रेन अमेरिका बोलणी**

युक्रेन युद्ध थांबवण्यासंदर्भात काल अबुधाबी रशिया, युक्रेन आणि अमेरिका या तीन देशांच्या प्रतिनिधींच्या वाटाघाटींची पहिली फेरी पार पडली. रशिया आणि युक्रेन यांच्यात जवळपास चार वर्षांपासून सुरू असलेल्या या संघर्षादरम्यान या तीन देशांच्या प्रतिनिधींच्या सहभागानं झालेली ही पहिलीच बैठक होती. कालच्या बैठकीत रचनात्मक चर्चा झाल्याचं अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**चलन गंगाजळी**

16 जानेवारी रोजी संपलेल्या आठवड्यात भारताच्या परदेशी चलन साठ्यात 14 बिलियन डॉलर्सच्यावर लक्षणीय वाढ झाल्यानं चलन साठ्यातील रक्कम 701 बिलियन डॉलर्स झाली. परदेशी चलन साठ्याचा मुख घटक असलेली परदेशी चलन मालमत्ता जवळपास 10 बिलियन डॉलर्सनी वधारून 560 बिलियन डॉलर्सच्या वर गेली. युरो, पाऊंड आणि येन या चलनांच्या मूल्यातील चढउतारांचा चलन मालमत्तेवर प्रभाव पडल्याचं भारतीय रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. सोन्याच्या साठ्यातही साडेचार बिलियन डॉलर्सहून अधिक भर पडली.

**टेबल टेनिस**

टेबल टेनिसमध्ये भारतीय जोडी मनुश शाह आणि दिया चितळे यांनी काल ओमानमधील WTT मस्कत 2026 मध्ये मिश्र दुहेरीचं विजेतेपद मिळवलं. तिसऱ्या मानांकित भारतीय जोडीनं चीनच्या चौथ्या मानांकित हुआंग युझेंग आणि शी जियाओ या जोडीला अंतिम फेरीत 3-2 ने हरवलं. सध्या जागतिक क्रमवारीत आठव्या स्थानावर असलेल्या मनुश आणि दिया यांनी WTT स्पर्धेत मिश्र दुहेरीत आपलं दुसरं विजेतेपद मिळवलं आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**